**MHST200028332020**

## वि.दि.दा.क्र.५३९/२०२३ मधील निशाणी क्र.११६ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा त्यांनी स्पेसिफिक परफॉर्मन्ससाठी दाखल केलेला आहे. सदरचा दावा सन २०१३ साली दाखल केला असुन दावा दाखल केल्यानंतर झालेल्या काही घटनांचे कागदपत्र वादी यांनी कोर्टात दाखल केलेले आहेत. मात्र त्याबद्दलची वस्तुस्थिती वादी यांच्या प्लीडींगमध्ये नाही. सदरची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. त्यामुळे दावा कलम १० नंतर १०अ प्रस्तुत अर्जामध्ये नमुद केल्यानुसार समाविष्ट करणेत यावा. सदरची दुरूस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असुन त्यामुळे मुळ दाव्यात कोणताही बदल होत नाही. तसेच सदर दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही. त्यामुळे, त्यांनी अशी विनंती केली की, सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३. प्रतिवादी क्रं.१ याने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज बेकायदेशीर असुन त्यातील कथने खोटी आहेत. सदर दुरूस्तीमधील दि.०९.०६.२०२१ व २९.१०.२०२० रोजीच्या घटनेबाबत जी कथने केलेली आहेत ती पुर्णपणे खोटी व बनावट आहेत. प्रतिवादीने दि.१०.१०.२०१४ रोजी त्याला झालेल्या मारहाणीबाबत प्रथम खबरी अहवाल दाखल केला आहे. सदरची दुरूस्ती करण्यास कोणतेही योग्य कारण घडलेले नाही. प्रस्तुतचा अर्ज हा केवळ दाव्याचे कामकाज लांबविणेकरीता दाखल केला आहे. वादी योग्य ती काळजी घेऊन दुरूस्ती मागत नाही. त्यामुळे, त्याने अशी विनंती केली की, सदरचा अर्ज खर्चासह नामंजुर करणेत यावा.

४. अर्ज व म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरची दुरुस्ती ही दावा दाखल झाल्यानंतर घडलेल्या घटना नमुद करणेबाबत आहे. सदर दुरुस्ती दाव्यामध्ये करण्यास परवानगी देणे न्यायोचित वाटते. सदर दुरुस्तीस परवानगी दिल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही कारण त्यांना जादा कैफियत देण्याची मुभा उपलब्ध आहे. तसेच सदर दुरूस्तीचा गुणावगुणावर विचार करणे दुरूस्ती अर्ज निर्णीत करताना आवश्यक नाही. केवळ सदर दुरूस्ती दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे का हे पाहणे गरजेचे आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होत नसुन ती दोन्ही पक्षकारांच्या वादाचे निराकरण करण्याकरीता आवश्यक आहे असे मला वाटते. प्रस्तुत दाव्यामध्ये मुद्दे निश्चीत झालेले आहेत. परंतु, वादीने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अदयाप दाखल केले नसल्याने सदर दाव्यात अदयाप पुराव्याचे कामकाज सुरू झालेले नाही. त्यामुळे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये पुराव्याचे कामकाज सुरू झाले नसल्यास दावा दुरूस्ती मंजुर करणे बंधनकारक आहे. वादींनी सदरचा दावा सन २०१३ मध्ये दाखल केलेला आहे. सदरचा अर्ज दि.१६.१२.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. त्यामुळे वादींनी सदर दुरूस्ती अर्ज १२ वर्षाच्या विलंबाने दिलेला आहे असे दिसुन येते. परिणामी, सदर अर्ज खर्चासह मंजुर होणेस पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## <u>आदेश</u>

१) अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२) वादीने खर्चाची रक्कम ₹.२०००/- (दोन हजार रुपये फक्त) प्रतिवादी क्रं.१ यास दयावी.

३) वरील खर्चाची पुर्तता केल्यानंतर वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती करुन दावा दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

ANKUSH ATMARAM PACHARNE

Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2026.03.07 11:20:13 +0530

स्थळ : वाई.
दिनांक : ०६.०३.२०२६

( ए.ए.पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.